॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ६ (प्रतिनिधी) : "कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उदयामुळे मोठ्या प्रमाणावर आशय निर्मिती होणार असून हा आशय योग्य आहे की अयोग्य, हे ठरविणे अत्यावश्यक ठरणार आहे. विपुल आशयनिर्मितीमुळे विश्वासार्हतेचे प्रश्नही वाढू शकतात. त्यामुळे सर्व माध्यमांनी विश्वासार्हतेला प्राधान्य देणे गरजेचे आहे," असे प्रतिपादन पुणे येथील थिंक बँकचे संस्थापक विनायक पाचलग यांनी केले.

मराठी पत्रकार दिनाच्या निमित्ताने राज्यातील नऊ विद्यापीठांच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माध्यमे" या विषयावरील विशेष ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी पुणे दैनिक सकाळचे संपादक सम्राट फडणीस यांचे व्याख्यान झाले.

**आशय निर्मितीपेक्षा वितरणाला महत्त्व :** "कृत्रिम बुद्धिमत्ता आता सामान्य नागरिकांच्या हातात आली आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्ती आशय निर्मिती आणि वितरणाचे काम करू लागला आहे. माध्यम क्षेत्रात उत्तम आशय महत्त्वाचा मानला जात असला तरी वितरणाला अधिक महत्त्व आले आहे," असे पाचलग यांनी नमूद केले.

"तंत्रज्ञानाच्या नव्या युगात अल्गोरिदम महत्त्वाची भूमिका बजावत आहे. गेल्या दहा वर्षांपासून अल्गोरिदममुळे समाजात अनेक बदल झाले आहेत. एका कुटुंबातील सदस्यांमध्येही वेगवेगळ्या प्रकारच्या विचारप्रवाहांची निर्मिती अल्गोरिदममुळे झाली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हा यात एक महत्त्वाचा घटक ठरणार आहे. केवळ आशय निर्मिती करून चालणार नाही, तर तो नेमक्या ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी वितरण कौशल्य समजून घेणे गरजेचे आहे," असे त्यांनी सांगितले.

**माध्यमांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता अपरिहार्य – सम्राट फडणीस :**

दैनिक सकाळचे पुणे संपादक सम्राट फडणीस यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले, "माध्यम क्षेत्र तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीपासून दूर राहू शकत नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता हे माध्यमांसाठी संकट नसून अपरिहार्य साधन आहे. माध्यम व्यवसायातील तंत्रज्ञानाचा वेग वाढल्यामुळे पत्रकारितेला तंत्रज्ञानाशिवाय चालना देणे अशक्य आहे." ते पुढे म्हणाले, "इंग्रजी माध्यमांत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी उपयोग सुरू आहे. भाषिक पत्रकारितेतही याचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होईल. बातमी लेखन, भाषांतर, निवेदन, लेख आदी कामांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता अचूक परिणाम साधेल. मात्र, कृत्रिम बुद्धिमत्तेने दिलेल्या माहितीची पडताळणी करणे आणि त्यासाठी प्रॉम्प्ट इंजिनिअरिंगचे कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे."

"कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे नोकऱ्या जाण्याची भीती अनाठायी आहे. उलट यामुळे नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील. माध्यम व्यवसाय वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा स्वीकार करणे अपरिहार्य ठरणार आहे," असे फडणीस यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. किरण ठाकूर यांना आदरांजली वाहून झाली. त्यानंतर विभागप्रमुख प्रा. डॉ. संजय तांबट यांनी डॉ. ठाकूर यांच्या कार्याचा आढावा घेतला.

कार्यक्रमात विविध विद्यापीठांमधील प्रमुखांनी सहभाग घेतला. यामध्ये प्रा. डॉ. निशा पवार (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर), प्रा. डॉ. दिनकर माने (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छ. संभाजीनगर), प्रा. डॉ. सुंदर राजदीप (मुंबई विद्यापीठ,मुंबई), प्रा. डॉ. मोईज हक (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर), प्रा. डॉ. मीरा देसाई (श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई), प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड) आदींचा समावेश होता.

स्वागत व प्रास्ताविक पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. सुधीर भटकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. गोपी सोरडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. शिवाजी जाधव यांनी मानले. या ऑनलाइन व्याख्यानाला राज्यातील विविध विद्यापीठांमधील पत्रकारिता विभागांचे शिक्षक, संशोधक, आणि विद्यार्थी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बातमी नं. २

जळगाव दि.६ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची प्रवेश पुर्व परीक्षा (पेट) एकूण १८९२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा केंद्रात पेट परीक्षा दि. २ ते ५ जानेवारी या कालावधीत घेण्यात आली. विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानव विज्ञान आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखेतील एकूण २४९६ विद्यार्थ्यांनी पेट परीक्षेसाठी फार्म भरले होते त्यापैकी ६०४ विद्यार्थी अनुपस्थित होते एकूण १८९२ विद्यार्थ्यांनी पेट परीक्षा दिली. या पेट विषयांच्या परीक्षेत कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रा. समीर नारखेडे यांनी परीक्षा केंद्राला भेट देऊन पाहणी केली.

मुख्य समन्वयक म्हणून प्रा. मनोज पाटील, समन्वयक म्हणून प्रा. सुरेंद्र कापसे, केंद्र प्रमुख म्हणून प्रा. के.एफ. पवार तसेच तांत्रिक अधिकारी म्हणून दाऊदी हुसेन काम पाहत होते. संशोधन विभागातील अधिकारी व कर्मचारी हे परीक्षा सुरळीत होण्यासाठी प्रयत्नशील होते.

.....................................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ — दिनांक: ६ जानेवारी, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी